प्रेसनोट

जा.क्र. ५९७ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०८/२०१७

## " खुनाचे प्रयत्नाचे गुन्हयात आरोपीस सात वर्षे सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

भंडारा:— भंडरा जिल्हयातील पोलीस स्टेशन पवनी अंर्तगत ग्राम गुडेगाव ता. पवनी, जि.भंडारा येथील तक्रारदार पिडीत नामे आनंदराव मेश्राम हा दिनांक. ०६/१२/२०१२ ला गावातच आपले भावाचे घरी जावुन जावयास आपले घरी दिवाळी निमीत्त जेवण्याकरीता बोलविण्यास गेला होता. जावया सोबत आपले घरी जात असता, रात्री ०७.३० वा. यातील आरोपी रामहरी नथ्थु क्षिरसागरे याने तक्रारदारचे समोर येवुन तक्रारदारचे डावे खाकेचे खाली व पोटावर बेंबीचे खाली जिवे ठार मारण्याचे उद्देशाने चाकुने मारून गंभिर जखमी केले, व त्या ठिकाणाहुन पळुन गेला, त्यानंतर नातेवाईक व घटनास्थळी हजर असलेल्या लोंकानी टाटा सुमो गाडीने ग्रामीण रूग्नालय पवनी येथे उपचाराकरीता घेवुन आले, उपचारा दरम्यान ग्रामीण रूग्नालय पवनी येथे घटनेबाबत वैद्यकीय अधीकारी व साक्षदारासंमक्ष पोलीसांना दिलेल्या बयानावरून आरोपी नामे रामहरी नथ्थु क्षिरसागरे वय ३८ वर्ष रा. गुडेगाव याचे विरूध्द रात्री. ०९.३० वा. पोलीस स्टेशन पवनी येथे अप क्र. १३१/२०१२ कलम ३०७ भदवी० अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक पि.बी. तळेकर पो.स्टे पवनी यांनी सरू केला व गुन्हयात आरोपी नामे रामहरी नथ्थु क्षिरसागरे वय ३८ वर्ष रा. गुडेगाव यास अटक केली, व तपास पुर्ण करून आरोपी विरूध्द विशेष सत्र न्यायालय भंडारा येथे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुनावनी मा. विशेष सत्र न्यायाधिश श्री आर.पी. पांडे यांचे समक्ष चालली, गुन्हयात सरकार पक्षातर्फे दुर्गा तलमले, सहायक सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय भंडारा, यांनी ९ साक्षदार तपासले दि. २४/०८/२०१७ रोजी गुन्हयात **आरोपी नामे रामहरी नथ्थु क्षिरसागरे वय ३८ वर्ष रा. गुडेगाव यास कलम ३०७ भादवी. अन्वये दोषी ठरवुन ७ वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रूपये दंड , दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली**, सदर गुन्हयात पोलीस नाईक चंद्रशेखर पटले, पोलीस स्टेशन पवनी यांनी पैरवी अधीकारी म्हणुन कामकाज केले.

**(कृपया सदरची प्रेसनोट समोरच्या पहील्या पानावर देण्यास विनंती)**

२४.८

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.